# जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर

दूरध्वनी : ०२४१ - २४११२१२ Email : dionagar12@gmail.com Fax: ०२४१ - २४२७३७३

वृत्तपत्राचे नांव - पुण्यनगरी दिनांक: 25 / 1 /२०१४


# लोकसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यात ३१ लाखांवर मतदार

अहमदनगर / प्रतिनिधी

राष्ट्रीय मतदार दिवसाचे औचित्य साधून शनिवारी (ता. २५) नगर जिल्ह्यातील सर्व मतदार केंद्रांवर अठरा वर्षांच्या नवमतदारांना छायाचित्र मतदार ओळखपत्र वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील माळी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. १६ सप्टेंबर ते २७ ऑक्टोबर २०१३ या कालावधीत दि. १ जानेवारी २०१४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम नगर जिल्ह्यातील सर्वच १२ विधानसभा मतदारसंघात राबविण्यात आला आहे. यामध्ये प्रारुप मतदार यादीवरील दावे व हरकतींवर निर्णय घेऊन एकूण १ लाख ९४ हजार ३१० मतदारांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. यामधील १८ वर्षांच्या नवमतदारांना राष्ट्रीय मतदार दिवसाचे औचित्य साधून ओळखपत्र देण्यात येणार असल्याचे माळी यांनी सांगितले.

नवीन वाढलेल्या एकूण १ लाख ९४ हजार ३१० मतदारांमध्ये १ लाख १ हजार ४८६ महिला, तर ९२ हजार ८१३ पुरुष मतदारांचा समावेश आहे. राष्ट्रीय मतदार दिवसाचे औचित्य साधून शनिवारी (ता.२५) जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम तसेच बक्षीस वितरण होणार आहे.

नगर जिल्ह्यातील १ जानेवारी रोजी अंतिम मतदार संख्या १६ लाख ४६ हजार ७२३ पुरुष व १४ लाख ७२ हजार ६७५ महिला अशी एकूण ३१ लाख १९ हजार ४०९ आहे. यापैकी ३१ लाख ३० हजार (९९.३८) मतदारांकडे छायाचित्र ओळखपत्र असल्याचे माळी म्हणाले.

विधानसभा मतदार संघनिहाय एकूण मतदार याप्रमाणे - अकोले - २ लाख ३० हजार ९१८, संगमनेर - २ लाख ४६ हजार १६५, शिर्डी - २ लाख ४१ हजार ७८८, कोपरगाव - २ लाख ३७ हजार ९६, श्रीरामपूर - २ लाख ५८ हजार ४७४, नेवासा - २ लाख ३२ हजार ७९४.

शेवगाव - ३ लाख ४ हजार १७१, राहुरी - २ लाख ६३ हजार ६८२, पारनेर - २ लाख ८४ हजार ५८२, नगर शहर - २ लाख ५० हजार ८९७, श्रीगोंदा - २ लाख ८२ हजार ९८३, कर्जत - जामखेड विधानसभा मतदारसंघ - २ लाख ८५ हजार ८५९.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने १ जानेवारीच्या अर्हता दिनांकावरील मतदार यादीतील मतदार मतदानास पात्र राहणार आहेत. फेब्रुवारीच्या शेवटच्या किंवा मार्च-२०१४ च्या पहिल्या आठवड्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची चिन्हे आहेत.